**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**
**करआकारणी व करसंकलन विभाग**

| | |
|---|---|
| परिपत्रक स्वरुप | **"माझी मिळकत, माझी आकारणी" योजना** स्वयंस्फुर्तीने मिळकतकराची करआकारणी करणाऱ्यांसाठी सवलत देणे बाबत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/९/कावि/३२५/२०२१, दिनांक ०८/१०/२०२१ |
| विषय : | मिळकतकराची आकारणी करणेकरिता स्वत:हून अर्ज करणाऱ्या मिळकतधारकास सामान्य करात सवलत देण्याबाबत |
| अंमलबजावणी कालावधी | स्थायी |
| कोणाच्या माहितीसाठी / कार्यवाहीसाठी | मिळकत कर आकारणी, तसेच वसूली करणारे सर्व अधिकारी / कर्मचारी |
| संदर्भ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,कलम १४० |

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहरातील इमारती व जमिनीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १२७ व १२९ नुसार करआकारणी करणेत येते. तसेच अनुसुची ड प्रकरण ८ नियम ७ (१) अन्वये त्या-त्या आर्थिक वर्षातील प्रचलित प्रती चौरस फूट दराने मिळकतीचे करयोग्य मुल्य निश्चित करणेत येते.

सद्यस्थितीमध्ये पिंपरी चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना या साथरोगाचा प्रादुर्भाव असल्यामुळे महापालिका कार्यक्षेत्रामध्ये फिरण्यास प्रतिबंध करणेत आला होता. दरम्यानचे कालावधीमध्ये नव्याने बांधकामे झालेली असून, सदर मिळकतींची प्राधान्याने करआकारणी होणे आवश्यक आहे अशा मिळकतींची करआकारणी करणेकामी जर मिळकतधारक स्वत: www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावरील शिघ्रगणकाद्वारे मिळकतकराच्या नोंदणीसाठी अर्ज करत असेल, तर अशा मिळकतीना मिळकतकरामध्ये सवलत देणेची बाब विचाराधीन आहे.

**तदनुसार "माझी मिळकत, माझी अकारणी" योजना पुढीलप्रमाणे कार्यान्वित करण्यात यावी.**

सबब, करआकारणी न झालेल्या मिळकतींचे मिळकतधारक महापालिकेचे संकेतस्थळावर अथवा स्वत: नोंदणीसाठी अर्ज करत असेल,तर अशा मिळकतधारक / नागरिक यांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४० मधील तरतूदीनुसार यापुढे नविन करआकारणी होणाऱ्या मिळकतीचे प्रकरणी ज्या वर्षात करआकारणी कायम होईल त्या आर्थिक वर्षाच्या चालू मागणीतील मिळकतकर बिलामधील **सामान्य करामध्ये 5%** फक्त पहिल्या वर्षाकरिता खालील अटी व शर्तींच्या अधीन सवलत देण्यात यावी.

१) मिळकतधारकाने स्वत: www.pcmcindia.gov.in या संकेत स्थळावरील शिघ्रगणकाद्वारे मिळकतकराच्या नोंदणीसाठी अर्ज करून करआकारणी संबधित आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

२) मिळकतधारकाच्या दाखल अर्जामध्ये नमूद मिळकतीची करआकारणी रजिस्टरला नोंद नसलेबाबत खातरजमा करुन करआकारणी करणेत यावी.

३) ज्या आर्थिक वर्षात करआकारणी कायम होईल त्या आर्थिक वर्षाच्या चालू मागणीतील मिळकतकर बिलामधील **सामान्य करामध्ये 5%** फक्त पहिल्या वर्षाकरिता सवलत देणेत यावी.

४) मिळकतधारकाने मिळकतकर भरते वेळी त्यास देय असलेल्या सामान्य करातील सवलतींसह सदर सवलत योजनेचा लाभ मिळकतधारकांना देणेत यावा.

५) सदर सवलतीचा लाभ हा मिळकतकर आकारणी झालेल्या आर्थिक वर्षाच्या अखेरीपर्यंत देण्यात यावा.

६) सदर सवलतीचा लाभ आदेशाचे दिनांकापासून पुढे प्राप्त झालेल्या अर्जाकरिता लागू राहील.

७) पुढील आदेश होईपर्यंत सदर सवलत योजनेची अंमलबजावणी करणेत यावी.

०७/१०/२१

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

कृपया मागे पहा.....

प्रति :-

१) प्रशासन अधिकारी/सहाय्यक मंडलाधिकारी/गट प्रमुख/ गटलिपिक
सर्व करसंकलन विभागीय कार्यालय

२) क्षेत्रिय अधिकारी,सर्व क्षेत्रीय कार्यालये
आपले कार्यक्षेत्रातील करसंकलन विभागीय कार्यालय व क्षेत्रीय कार्यालयाचे परिसरात फ्लेक्स,भित्तीपत्रके,जाहीर आवाहन पत्रके द्वारे सवलत योजनेची प्रसिद्धी करण्यात यावी.

प्रत :-

१) माहिती व जनसंपर्क विभाग / आकाश चिन्ह परवाना विभाग
२/- प्रस्तुत परिपत्रकामधील सवलत योजनेस व्यापक प्रसिद्धी देणेत यावी. व शहरातील प्रमुख रहदारीचे चौकामध्ये अधिकृत ठिकाणी होर्डिंग / फ्लेक्स द्वारे प्रसिद्धी करण्यात यावी.

२) लेखा विभाग

३) मुलेप विभाग

४) संगणक विभाग / टेक नाईन सर्व्हीसेस प्रा.लि.

(स्मिता झगडे)
उप आयुक्त,करसंकलन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.